ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 11 | ISSUE - 9 | MAY - 2025

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# डॉ. आंबेडकर यांचेशेती, जल व विद्युत विषयक धोरण



**प्रा. महादेव श्रावण गायकवाड**
**सहाय्यक प्राध्यापक, ए. आर. बूर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालयं, सोलापूर.**

## प्रस्तावना

भारताची आधुनिक पायावरील राष्ट्र म्हणून जडणघडण विसाव्या शतकात १९२० ते १९५० च्या दशकांत झाली. या काळात राजकीय स्वातंत्र्य तर मिळालेच, पण राज्यघटना, राजकीय - आर्थिक आणि सामाजिक घडी, राज्यांची पुनर्रचना, फाळणी तसेच आर्थिक विकास आणि सामाजिक विकासाचा कृती-कार्यक्रम असे सर्व या काळात घडत गेले. या पायावर आधुनिक भारतीय राष्ट्राची घडण झाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा कार्यकाळही हाच आहे मुंबईत १९१८ साली त्यांचे नेतृत्व राजकीय क्षितिजावर उदयास आले सुमारे ४० वर्षांच्या (१९१६-१९५६) काळात डॉ. आंबेडकर ज्ञानदान आणि नेतृत्व करीत होते, राष्ट्राच्या उभारणीत योगदान देत होते. समस्या सोडवण्यासाठी धोरणे सुचवण्याची डॉ. आंबेडकरांची पद्धती त्यांच्या समकालीन नेत्यांपेक्षा निराळी होतीविषयाचा सखोल अभ्यास करून, कारणे ओळखून मगच उपाय शोधण्याची शिस्त त्यांच्यात होती म्हणूनच, त्यांनी सुचवलेले उपाय हेआजही राष्ट्रापुढील समस्यांचा सामना करण्यासाठी समर्पक ठरतात.

## संशोधनाची उदिष्ट्ये :

१) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याशेतीविषयक धोरणाचा अभ्यास करणे.
२) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याजल धोरणावर प्रकाश टाकणे.
३) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यावीज धोरणाचा अभ्यास करणे.

## संशोधन पद्धती :

प्रस्तुत संशोधनासाठी ऐतिहासिक पद्धतीचा अवलंब करून यामध्ये प्राथमिक आणि दुय्यम साधनांचावापर करण्यात आलेला आहे. याशिवाय विविध संदर्भ ग्रंथ, नियतकालिके , पाक्षिके, मासिके, वर्तमानपत्रातील लेख इत्यादींचा उपयोग करण्यात आला आहे.

## संशोधनाचे महत्व :

१) आज शेतीचा जो विकास घडून आला आहे त्याची पायाभरणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केली आहे
२) सर्वप्रथम बहुद्देशीय नदी खोरे प्रकल्पाची संकल्पना डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी मांडली
३) देशातील पायाभूत सुविधांचा उदावीज यांचा विकास झाल्याशिवाय देशातील शेती,उद्योग आणि औद्योगिक क्षेत्र यांचा विकास होणार नाही.

### आर्थिक विचार :

डॉ. आंबेडकर यांनी देशाच्या आर्थिक विकासात दिलेल्या योगदानाची पुरेशी चर्चा सहसा होत नाही. स्वातंत्र्यपूर्व कायदेमंडळात कामगार खात्याचे मंत्रिपद त्यांच्याकडे असताना, 'पुनर्बांधणी आणि पुनर्वसन योजना १९४२-४६' तयार झाली व प्रत्यक्षात आली. १९५१-५५ च्या पहिल्या पंचवार्षिक योजनेने त्या योजनेचा आधार घेतला. डॉ. आंबेडकरांनी कामगारविषयक धोरण आखलेच, पण अनुसूचित जातींविषयीचे धोरण आणि महत्त्वाचे म्हणजे पाणी आणि वीज यांच्या विकासाचेही धोरण त्यांनी आखले होते. आजही त्या कामगारविषयक धोरणाचा आधार घेतला जातो, कोलकात्यात पहिले रोजगार – विनिमय केंद्र सुरू झाले, तेही याच धोरणामुळे. अनुसूचित जातींसाठी सरकारी नोकऱ्या व शिक्षणसंधींमध्ये आरक्षण (१९४३) हे निर्णय त्यांच्या धोरणांमुळे झाले. केंद्रीय जल आयोग आणि केंद्रीय वीज प्राधिकरण या आजही कार्यरत असलेल्या यंत्रणांची सुरुवात डॉ. आंबेडकरांच्या पाणी आणि वीजविषयक धोरणातून झाली. दामोदर, हिराकुड, शोण ही धरणे तसेच दख्खनचा पाटबंधारे विकास हे या धोरणामुळे मार्गी लागले. वास्तविक, केंद्र सरकारचे पाणी आणि वीजविषयक आद्य धोरणकर्ते असे रास्त श्रेय डॉ. आंबेडकर यांना मिळायला हवे

### जमीनदारी संपवण्यासाठी प्रयत्न:

पूर्वीच्या काळी गावोगावी खोती पद्धत असायचीशेतकऱ्यांकडून शेतसारा जमा .खोत हे जमीनदार आणि वतनदार असायचे . .करून तो सरकार दरबारी जमा करण्याचे काम खोत करायचेमात्र शेतकऱ्यांच्या अज्ञानाचा, अशिक्षितपणाचा फायदा घेऊन ते शेतकऱ्यांची लूट करायचेजमिनीचा अकरा महिने भाडेपट्टा लिहून घ्यायचा ., एका एकरमागे खंडीभर भात मक्ता म्हणून घ्यायचा, तो जर नाही दिला तर पुढच्या वर्षी दीडपट सारा वसूल करायचा, एखाद्या कुळातील वसुली न झाल्यास त्या कुळाच्या शेतात असणाऱ्या आंबा, फणस, नारळाच्या झाडांवर )Coconut Tree) खोताचा हक्क असायचा, हे सर्व प्रकार कोकण भागात मोठ्या प्रमाणात सुरू होते त्यांच्याविरुद्ध सहा वर्षे . या आंदोलनाला बाबासाहेबांचा भक्कम पाठिंबा तसेच सहभाग ह.शेतकरी आंदोलन सुरू होते◌ोता.

१९३४ मध्ये शेतकरी परिषद भरवण्यात आली होती, त्याचे अध्यक्षपद बाबासाहेबांकडे होतेयाच परिषदेत बाबासाहेबांनी . २७ .खोती पद्धती विरोधातील आंदोलनाचे नेतृत्व करत होते नारायण नागू पाटील हे त्या .शेतकरी मजूर पक्षाची घोषणा केली होती पासून सुरू १९३३ ऑक्टोबरझालेला हा संप )Strike) तब्बल सहा वर्षे सुरू होता.या काळात शेतकऱ्यांचे प्रचंड हाल झाले.

शेतकरी आंदोलनाच्या इतिहासातील हे पहिले आंदोलन होतेरोजी १९३९ सप्टेंबर १७ आमदारांच्या पाठिंब्यावर १४ त्यानंतर . त .बाबासाहेबांनी खोती पद्धत बंदचे विधेयक विधिमंडळात मांडले◌्यानंतर सरकारला जाग आली पासून सरकारने १९५० साधारणपणे . )Government) खोती निर्मूलन अधिनियम लागू केलएकर जमीन ८६० हजार २२ कुलाबा अर्थात रायगड जिल्ह्यातील एक लाख . .मुक्त केली आणि कित्येक दशकांची ही जुलमी पद्धत संपुष्टात आलीखोतांच्या तावडीतून

### खोती पद्धतीचा अंत :

स्वातंत्र्यपूर्व काळात कोकणात खोती पद्धती प्रचलित होती. खोती पद्धती म्हणजे खाजगी सावकारी असते. बाबासाहेबांनी खोती पद्धती नष्ट करण्यासाठी 17 सप्टेंबर 1937 ला विधानसभेत विधेयक मांडले .बाबासाहेबांनी खोती पद्धती कायमची नष्ट करण्याकरता अनेक पातळ्यांवरती प्रयत्न केले .याकामी बाबासाहेबांना अनंतराव चित्रे आणि सुरुवात टिपणीस यांची मदत झाली. चित्रे आणि टिपणीस यांच्यावरती खटले दाखल झाले त्यावेळी बाबासाहेब स्वतः त्यांच्यासाठी न्यायालयात उभे राहिले. आणि युक्तिवाद केला .बाबासाहेबांच्या विचारातून अजून एक अमूल्य विचार समोर येतो आणि तो शेतीसाठी खूप महत्त्वाचा आहे. तो विचार म्हणजे बाबासाहेबांनी त्याकाळी मांडलेला सामुदायिक शेती विचार. सामुदायिक शेती केल्यानंतर शेतकऱ्यांना बरे चे फायदे होतील आणि कमी श्रमात अधिकाधिक उत्पन्न मिळेल हा त्यांचा हेतू होता.

### जलसिंचन :

शेती विकासासाठी पाणी आणि वीज या दोनच गोष्टी सर्वात महत्त्वाच्या आहेत. १९४२ ते १९४६ या काळात केंद्र सरकारने जी युद्धोत्तर पुनर्निर्माण योजना अमलात आणली, त्यासाठी जे मंत्रिमंडळ स्थापन केले त्याचे बाबासाहेब सभासद होते. या आर्थिक योजनेचे उद्दिष्ट व भूमिका निश्चित करण्याचे काम बाबासाहेबांनी केले या योजनेत बाबासाहेबांनी ज्या जलधोरण आणि विद्युत प्रकल्पांची योजना मांडली त्या योजनेला स्वातंत्र्यानंतरच्या पहिल्या पंचवार्षिक योजनेत अग्रक्रम देऊन १९४८ नंतर त्यांना मंजुरी मिळाली या अर्थाने

बाबासाहेब आंबेडकर हे भारताच्या जल आणि विद्युत निर्मितीचे प्रणेते आहेत.बिहार आणि बंगाल या दोन राज्यांना जोडणाऱ्या दामोदर नदीचे विपरीत रूप पाहून या नदीवर धरण बांधण्याचा धाडसी निर्णय बाबासाहेबांनी घेतला होता कारण ही नदी बिहारमध्ये जमिनीची झीज करते, तर पश्चिम बंगालमध्ये पुराने थैमान घालते या नैसर्गिक आपत्तीचा सामना कसा करायचा, या नदीचे पाणी नियंत्रित करून शेतीचा विकास कसा करता येईल, यासाठी बाबासाहेबांनी जे अहोरात्र कष्ट घेतले त्याला तोड नाही. 'दामोदर खोरे' प्रकल्पानंतर बाबासाहेबांनी ओरिसातील महानदीवर 'हिराकुंड' धरण बांधून ओरिसातील जनतेला महानदीच्या पुरापासून संरक्षण दिलेयाबरोबरच त्यांनी १९४५ च्या दरम्यान मध्य प्रदेशात वाहत जाऊन गंगेला मिळणाऱ्या सोन नदीवर बहुउद्देशीय प्रकल्प उभा केला.जल आणि विद्युत धोरणांमागे बाबासाहेबांची स्वतंत्र अशी भूमिका होती

जेव्हा ते १९४२-४६ या कालावधीत श्रम, सिंचन आणि विद्युतशक्तीवरील धोरण समितीचे अध्यक्ष झाले भारताचे पाटबंधारे व ऊर्जामंत्री म्हणून त्यांनी केलेले काम याचीच साक्ष देतेभारतामध्ये संयुक्त प्रकल्प, बहुउद्देशीय प्रकल्प या संकल्पनांचे सर्वप्रथम प्रवर्तन डॉ आंबेडकरांनीच केले या कालखंडात ते व्हॉइसरॉयच्या एक्झिक्युटिव्ह कौन्सिलचे मेंबर होते म्हणजेच, त्या काळातल्या केंद्रीय मंत्रिमंडळात कॅबिनेट मंत्री होते या चार वर्षांच्या काळात दामोदर नदी प्रकल्प, हीराकुंड प्रकल्प, सोनू नदी प्रकल्प व राष्ट्रातील पहिल्या १५ मोठ्या धरणांची ब्लू प्रिंट त्यांनी तयार केली व प्रत्यक्ष कामालाही सुरुवात केलीहे सर्व महाप्रकल्प त्यांनी उभे केले या सर्व बहुउद्देशीय प्रकल्पांची बांधणी केवळ पूरनियंत्रण या एकमेव उद्देशासाठी केली नाही, तर पूरनियंत्रण, जलसिंचन, विद्युत निर्मिती, नौकानयन आणि पाणीपुरवठा हा विराट व उदात्त दृष्टिकोन त्याच्या पाठीमागे होता. नवीन जलधोरण आणि विद्युत धोरण ठरविण्यात डॉ. आंबेडकरांचा सिंहाचा वाटा राहिलेला आहे. सिंचन, जलमार्ग आणि सांडपाणी व्यवस्था यासंबंधी त्यांनी दूरदर्शी धोरण अंगीकारल्याचे दिसून येतेआपण हे लक्षात घेतले पाहिजे, की आज देशपातळीवर सिंचन आणि विद्युत ऊर्जा विकासामध्ये महत्त्वपूर्ण योगदान देत असलेल्या केंद्रीय जल आयोग आणि केंद्रीय ऊर्जा प्राधिकरण या तांत्रिक संघटनांची मुहूर्तमेढ डॉ आंबेडकरांनी रोवली. शेती समृद्ध करण्यासाठी धरणांची आवश्यकता आहे आणि धरणे केवळ जल व्यवस्थापनासाठी नव्हे, तर ऊर्जा निर्मितीची केंद्रे झाली पाहिजेत, असा त्यांचा दृष्टिकोन होता. याप्रसंगी केंद्रीय जल आयोगाचे तत्कालीन अध्यक्ष डॉ. ए. एन. खोसला यांचे महत्त्वाचे वक्तव्य उद्धृत करावेसे वाटतेहे वक्तव्य हीराकुंड धरणाच्या पायाभरणी (१९४५) प्रसंगी कटक येथे तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या उपस्थितीत केले आहे. ज्या धरणांना नेहरू आधुनिक भारताची मंदिरे म्हणतात, त्यांच्या पायाभरणीचे काम डॉ. आंबेडकरांनी १९४२-४६ या काळात केले.

**वीज :**

भारताच्या विकासा बाबत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी महत्वाचा विचार मांडला होता.आपल्या देशात मोठ्या प्रमाणात नैसर्गिक साधने आहे. त्या नैसर्गिक साधनांवर आपले उद्योग धंदे असले पाहिजेत विशेष म्हणजे नियोजन करून आपल्याला योग्य प्रकारे देशाचा विकास करणे शक्य आहे असे त्यांचे विचार होतेभारताचा विकास कशाप्रकारे केला पाहिजे ? या संदर्भात ते म्हणतात की, "आपल्या देशातील नैसर्गिक स्रोतांचे नियोजन करून त्या स्रोतांचा योग्य उपयोग केला तर भारताचा विकास होईल." देशात औद्योगिकीकरण घडवून आणण्यासाठी विद्युत आवश्यक आहे, यार्च जाणीव डॉ. आंबेडकरांना होती म्हणून त्यांनी विद्युतची निर्मिती करण्याबाबत राष्ट्रीय धोरण ठरवले. देशात विद्युतचा विकास करण्यासाठी डॉ आंबेडकरांचे महत्वाचे धोरण ठरले. विद्युतच्या संदर्भात राष्ट्रीय धोरण ठरवताना २५ ऑक्टोबर रोजी डॉ. आंबेडकरांनी "भारतामध्ये विद्युत ही स्वस्त आणि मुबल असावी?" असा प्रश्न उपस्थित करून त्या प्रश्नाचे उत्तर त्यांनी दिले त्यांच्या मते, "स्वस्त आणि मुबलक बिद्युत असल्याशिवाय औद्योगिकीकरण, यशस्वी होऊ शकत नाही." यावरून डॉ. आंबेड दूरदृष्टी आपल्या लक्षात येते डॉ. आंबेडकरांनी विद्युतच्या संदर्भात महत्त्वपूर्ण राष्ट्रीय धोरण तयार केले होतेत्या राष्ट्रीय विद्युत धोरण आधारावरच स्वातंत्र्योत्तर काळात विद्युतचा विकास झाला त्यांच्या मते, "देशातील मोठे आणि पायाभूत उद्योग हे राष्ट्राच्या मालकीचे असले पाहिजेत

डॉ. आंबेडकरांनी भारताच्या नियोजित विकासाबाबत केवळ विचार मांडले नाहीत तर त्यांनी भारताच्या विकासाच्या संदर्भात अत्यंत महत्त्वाकांक्षी असे बहुउद्देशीय प्रकल्प देशात उभारले बहुउद्देशीय नदी खोरे प्रकल्पाची (Multi-purpose River Valley Project) संकल्पना त्यांनी मांडली दामोदर नदी खोरे योजना तयार करण्यापासून तर ती मंजूर करून घेण्यापर्यंत सर्व कार्य डॉ आंबेडकरांनी आपल्या देखरेखीखाली पूर्ण केले होते दामोदर नदी योजनेप्रमाणेच हिराकुड नदी योजना, सोने नदी खोरे योजना इत्यादी योजनांचे प्रारूपदेखील त्यांनी तयार केले होते स्वातंत्र्योत्तर काळात देशात धरणांचे जे प्रकल्प उभारण्यात आले त्याची पायाभरणी डॉ आंबेडकरांनी १९४२ - १९४६ च्या दरम्यान केली होती. केंद्रीय जल आयोगाची स्थापना १९४५ मध्ये त्यांनी केली होती. दामोदर नदी योजना, हिराकुड

नदी योजना, सोने नदी खोरे योजनांमुळे पुराचे संकट टळले. त्याचबरोबर धरणांमुळे लाखो शेतकऱ्यांच्या शेतीसाठी सिंचनाची व्यवस्था झाली. तसेच औद्योगिक विकासाकरिता विद्युतची निर्मिती करण्यात आली. दामोदर प्रकल्पाबद्दल कोलकता येथील परिषदेत ३ जानेवारी १९४५ रोजी डॉ. आंबेडकर यांनी सांगितले की, "दामोदर प्रकल्प हा बहुउद्देशीय प्रकल्प असेल. आमचा उद्देश केवळ पुराची समस्या सोडविण्यापुरता मर्यादित नसून सिंचन, विद्युत आणि जल वाहतूक हा असला पाहिजे"

## समारोप :

बाबासाहेब आंबेडकर नामवंत कृषि अर्थतज्ञ होते शेती हे केवळ पोत भरण्याचे साधन नसून राष्ट्रीय उत्पादनाचे मोठे साधन आहे,शेतीकडे केवळ उपजीविकेचे साधन महणून पाहू नये. आर्थिक विकासाचे साधन म्हणून शेतीला विशेष महत्व द्यावे. असा आग्रह ते सतत धरत. हा विचार किती दूरदृष्टीचा होता याची प्रचिती आज येते.

यावरून असे लक्षात येते, की डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शेती विषयक चिंतन किती मूलगामी होते. प्रागतिक चळवळींना बळ देत असताना, शेतकऱ्यांच्या प्रश्नाकडे जाणिवेतून ते पाहतात शेतीची उत्पादनक्षमता वाढावी, म्हणून शेत जमिनीचे सपाटीकरण, बांध बंदिस्ती, सिंचनाची सोय, भांडवली गुंतवणूक केली, तरच शेती लाभाची ठरेल, अशी त्यांची धारणा होती. जलसिंचनाच्या सुविधा निर्माण झाल्याशिवाय किफायतशीर शेती होऊ शकत नाही. यासाठी त्यांनी बहुउद्देशीय प्रकल्पांची उभारणी केली. आंतरराज्य नदी जोड प्रकल्पाची कल्पनाही त्या काळात बाबासाहेबांनी मांडली. कुशल श्रम आणि प्रगत तंत्रज्ञानाने शेती सुधारली जाऊ शकते, हे त्यांचे म्हणणे होते. कृषी क्षेत्राचे यांत्रिकीकरण करूनच विकास साधला जाऊ शकतो किंबहुना यंत्राच्या साह्याने शेती केल्याशिवाय उत्पादनात वाढ होणेशक्य नाही, ही त्यांची मूलभूत विचारदृष्टी होती. शासकीय समाजवादाचे धोरण अवलंबत, सामुदायिक शेतीकडे वळावे लागेल, हा संदेशही ते देतात.

## संदर्भ :


1. डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे , डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समिति,उच्च व तंत्रशिक्षण विभाग,महाराष्ट्र शशन , २०२१
2. पवार दया (संपादक), डॉ. *बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथ*, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, प्रथम आवृत्ती, २५ डिसेंबर १९९३
3. गायकवाड दत्तात्रय , बहुद्देशीय नदी खोरे विकास आणि डॉ. आंबेडकरांची जलनीती
4. धनंजय कीर , डॉ.बाबासाहेब आंबेडकर, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, तिसरी आवृत्ती २००३
5. लोकराज्य *डॉ.बाबासाहेब आंबेडकर जन्म शताब्दी विशेषांक*, एप्रिल १९९१
6. लोकसत्ता *डॉ.आंबेडकरांकडून पाणी, वीज व शेतीचा सूक्ष्म विचार'* एप्रिल २० , २०१६
7. थोरात सुखदेव, लोकसत्ता, *राष्ट्र उभारणीत डॉ. आंबेडकरांचे योगदान*, ७ डिसेंबर २०१८
8. प्रा.डॉ.सतीश यादव ,मटा विशेष लेखः *शेतकऱ्यांचे बाबासाहेब*, ६ डिसेंबर २०२२ सचिन होळकर, ॲग्रो विशेष, बाबासाहेब आंबेडकरांचे शेतीविषयक विचार आजही मार्गदर्शक, ६ डिसेंबर २०२२
9. लोकराज्य , माहिती व जनसंपर्क महासंचानालय, महाराष्ट्र शासन, डिसेंबर २०१५
10. लोकराज्य , माहिती व जनसंपर्क महासंचानालय, महाराष्ट्र शासन, एप्रिल २०१६
11. लोकराज्य , माहिती व जनसंपर्क महासंचानालय, महाराष्ट्र शासन, एप्रिल २०१७